जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२४/०९/२०२४
## दि.२३/०९/२०२४ रोजी रात्री ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १५६/२०२४, भारतीय न्याय संहीता कलम ३०९(४) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ५१ वर्ष रा.हिंगणे खुर्द सिंहगड रोड पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/९/२०२४ रोजी रात्री २२/१२ वा ते रात्री २२/३० वा.चे सुमारास झाशी राणी चौक डेक्कन पूणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील २५,०००/-रू.किमतीचा मोबाईल जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अजय भोसल मो.नं.८६५२७४४६४७ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ३०८/२०२४,भारतीय न्याय संहिता कलम ३१९(२),३१८(४),२०४,६१(२),माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ६७ वर्षे,रा.पानमळा,सिंहगड रोड पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०६/०७/२०२४ ते दिनांक ०९/०७/२०२४ रोजी राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक याने टेलीकॉम रेग्युलेटरी अ‍ॅथॉरिटी ऑफ इंडीया मधुन बोलत असल्याचे सांगुन फिर्यादी यांचे आधारकार्ड व सिमकार्डचा वापर डार्क वेब करीता केले असल्याचे सांगितले. त्यानंतर अनोळखी मोबाईल वरुन फोन करुन सायबर क्राईम ब्रँच मुंबई येथे कंम्प्लेंट करण्यास सांगुन, व्हॉटसअ‍ॅप कॉल वरील व्यक्तीने व्हिडीओ कॉल करुन सायबर क्राईम ब्रँच मुंबई येथुन ऑफिसर बोलत असल्याचे सांगुन फिर्यादी यांचे आधारकार्डचा वापर करुन एका ऑफिसरने पिस्टल आणि ड्रग्ज विकत घेतल्याबाबतची कंम्प्लेंट फिर्यादी यांचेवर असल्याचे सांगितले. फिर्यादी यांचे आधारकार्ड मनी लॉड्रींगकरीता वापरते असुन त्याव्दारे तीन बँकेमध्ये बँक खाते उघडण्यात आले असल्याचे सांगुन फिर्यादी यांचेकडुन त्यांचे प्रॉपर्टी व बँकेची माहिती घेवुन व्हिडीओ कॉल चालु ठेवण्यास सांगुन पुण्यामधील ऑफिसर ला भेटण्यास सांगितले. त्यानंतर नमुद व्यक्तीने फिर्यादी यांचे बँक खात्यातील रक्कम बँकेचे अकाऊंटमध्ये ट्रान्सफर करण्यास सांगुन क्लिरंन्स सर्टिफीकेट देणार असल्याचे सांगितले. फिर्यादी यांनी ट्रान्स्फर केलेली रक्कम पुन्हा त्यांना परत देणार असल्याचे सांगुन सायबर क्राईम ब्रँच मधुन बोलत असल्याचे सांगत असलेल्या व्यक्तीने बँक खाते क्रमांक देवुन त्यावर एकुण २७,००,०००/- रुपये ट्रान्स्फर करण्यास सांगुन सदरचे पैसे स्विकारुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) श्री.अमोल मोरे,मो.नं.९८७०११९४९२ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ९०३/२०२४,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला वय २८ वर्षे,रा.पेरणे फाटा,लोणीकंद पुणे |

| | |
|---|---|
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३१/०१/२०२४ ते दिनांक ११/०२/२०२४ ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक यांनी टेलीग्रामवर वर्क फ्रॅाम होमचा मेसेज देवुन त्या विषयी फिर्यादी यांनी माहिती विचारली असता त्यांना माहिती देवुन त्याप्रमाणे टास्क करण्यास सांगुन त्यांना त्याबाबत काही रक्कम परत करून फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला त्यानंतर त्यानी प्रीपेड टास्कमध्ये जास्त परतावा मिळण्याचे आमिष दाखवुन विविध बँकांमध्ये ते सांगतील तेवढया रकमा भरून सदर टास्क पुर्ण केले. त्या करीता फिर्यादी यांनी २२,५०,००९/- रू.भरले होते.त्यापैकी फिर्यादी यांना प्राप्त झालेली रक्कत वजा करून २१,९४,३२३/-रुपये ही परत न करता आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी.श्री.पंडीत रेजितवाड,मो.नं.९९२३८१९२३५ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ४०३/२०२४, भा.न्या.संहिता कलम ३०३(२),४२७ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ५६ वर्ष,रा.कात्रज पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/०९/२०२४ रोजी दुपारी १४/३० वा ते सायं.१६/१५ वा.चे दरम्यान विदया सहकारी बँक मुकूंदनगर चे समोरील पीएमटी बस स्टॉपजवळ पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांची मोटार कार ही वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी पार्क व लॉक करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात इसमांने मागील डाव्या दरवाज्याची काच फोडून नुकसान करून गाडी मध्ये असलेली स्काय बॅग मधील रोख २०,०००/-रुपये व महत्वाचे कागदपत्रे असा एकुण २०,२००/- रुपये किंमतीचा दस्तऐवज बॅगसह स्वःताच्या आर्थिक फायदया करीता चोरून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. रविंद्र कस्पटे मो.नं.७०३८४९९७१७ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे २१२/२०२४,भारतीय न्यास संहिता कलम ३०५,३१४,३१६(५),३१७(२),२३८,३(५) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४७ वर्ष रा.सोपान बाग,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम व इतर अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/०८/२०२४ रोजी ते दिनांक ०६/०९/२०२४ रोजी आरोरा टॉवर्स,कॅम्प,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी मागील दोन महिन्यांपुर्वी त्यांचे बॅकेतील लॉकर उघडले असता,त्या मध्ये सर्व सोन्याचांदीचे दागिने व डायमंडचे दागिने व रोख रक्कम हे सुस्थितीत मिळुन आले होते, त्यानंतर दि.०६/०९/२०२४ रोजी ते बँकेत गेल्यावर त्यांना समजले कि,दि.१३/०८/२०२४ रोजी यातील नमुद इसमांनी संगनमताने कोणतीही परवानगी न घेता फिर्यादी यांचे लॉकर हे ३ ते ४ वेळा प्रयत्न करून उघडुन त्यातील रोख रक्कम रु.९,५०,०००/- सोन्या चांदीचे,डायमंडचे मौल्यवान दागिने,पावत्या व इतर महत्वाची कागदपत्रे असा एकुण २,७८,०६,७०१/- रुपये किंमतीचे बँकेचे कोणत्याही नियमांचे पालन न करता स्वतःहुन काढुन घेवुन ज्वेलर यास देवुन त्याने कोणतीही शहानिशा न करता सर्व दागिने पुरावा नष्ट करण्यासाठी वितळुन टाकले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.विशाल दांडगे, मो.नं.९९२३३४५२८० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**